# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०५.१०.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) कळमणा पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २८.०९.२०२६ चे १८.१० वा. चे दरम्यान, फिर्यादी मुन्नालाल रमचरी वर्मा, वय ४४ वर्षे, रा. प्लॉट क्र. १४, मंगलमुर्ती सोसायटी, भरतवाडा रोड, कळमणा, नागपूर यांनी त्यांची हिरो एचएफ डिलक्स गाडी क्र. एम.एच. ४९ बी.एल १३८३ किंमती २५,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे कळमणा हद्दीतील शुक्ला लॉनजवळ उभी करून, लघुशंकेकरीता रोडचे कडेला गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, कळमणा पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न करुन आणि त्याचा शोध घेऊन, आरोपी नामे दशरथ उर्फ लक्की बुदधुलाल साखरे, वय २२ वर्षे, रा. विजयनगर, कळमणा, नागपूर, ह.मु. — बडा ताजबाग, ताजी पार्क, गाल्डन गल्ली, सक्करदरा, नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हे संबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याचे ताब्यातुन चोरी केलेले वाहन जप्त करण्यात आले आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग), वपोनि. प्रविण काळे यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. करीम पठान व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**२) तहसील पोलीसांची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०४.१०.२०२६ चे ०५.३० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांनी प्राप्त माहितीवरुन, पोलीस ठाणे हद्दीत, अब्बुमिया मस्जिदजवळ, अन्सारनगर, मोमनीपुरा येथे सापळा रचुन बोलेरो पिकअप वाहन क्र. एमएच ४९

डी १३२६ ला थांबवुन वाहन चालकाचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव भुषण उर्फ रणजीत महादेव रामटेके वय २५ वर्ष रा. डोंगरी, वार्ड क्र. ३, मौदा, नागपुर असे सांगितले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता, लहान मोठे ०८ गोवंशीय जनावरांना अत्यंत क्रुरपने व चारापाणी न देता, दाटीवाटीने बांधुन ठेवल्याचे व त्यांची वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. जनावरांबाबत विचारपुस केली असता, ती पाहिजे आरोपी मोहम्मद शरीफ कुरेशी व मोहम्मद शाहबाज कुरेशी यांची असुन, कत्तलीकरीता नेत असल्याचे त्याने कबुल केले. आरोपीचे ताब्यातुन गोवंशीय जनावरे व बोलेरो पिकअप वाहन असा एकुण कि. ४,३०,०००/—रु. चा मुद्येमाल जप्त आला. आरोपी हा गोवंशीय जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक करतांना समक्ष मिळून आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे तहसील येथे कलम ११२ भान्यासं., सहकलम ५(अ)(१)(२),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११ (१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम —१९६० सहकलम ८३,१७७, मोवाका अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संजय मेंढे व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे तहसील :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.१०.२०२६ चे ०३.२५ वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शाहरुख खान नावाचा इसम ज्याने अंगात हिरवा टि—शर्ट व कार्बन ब्लॅक रंगाचा जिन्सपॅन्ट व लाल टोपी घातलेली असुन, तो बकराबंडी, शाहबुद्यीन शाह बाबाचे दर्गाहजवळ बसुन आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम बसलेला दिसुन आला. त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळून जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शाहरुख खान कामिल खान वय ३१ वर्षे रा. बकरामंडी, मोमीनपुरा, तहसील नागपूर असे सांगीतले. त्याचे अंगझडतीत त्याचे ताब्यातुन लोखंडी चायनिज चाकु किंमती ३००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि संदीप भिताडे यांचे तक्रारीवरुन आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.१०.२०२६ चे १८.३० वा. ते ०४.१०.२०२६ चे १७.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत प्लॉट क्र. ३३, पालकर ले आऊट, लक्ष्मी नारायण मंदीराजवळ राहणारे फिर्यादी रितेश तुळशीराम क्षीरसागर वय ४२ वर्ष हे आपले राहते घराचे मुख्य दरवाज्याला कुलुप लावून परिवारासह वडीलांचे अक्करमासे कार्यक्रमाकरीता पुणे येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने कुलुप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरुममधील लाकडी आलमारीचे लॉक तोडून त्यातील रोख ३०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,३७,२००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. व्यंकटेश नुलगोंडावार ७५०७१०८४२७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे अजनी :</u>—** दिनांक ०४.१०.२०२६ चे १३.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, मेडीकल हॉस्पिटल, वार्ड क्र. ८७ समोर एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे ३५ ते ३९ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, डोक्याचे केस—काळे व टक्कल पडलेले, उंची—५ फुट ४ इंच, अंगात—काळया रंगाचा शर्ट व जिन्स घातलेला आहे. ओळखचिन्हे—उजवे हातावर 'महेंद्र' नाव गोंदलेले असुन उजवे हातात स्टीलचे कडे व पिवळया रंगाचा धागा आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. अल्लानुर शेख यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**